लातूर
# भूकंप
LATUR BHUKAMP
संपादक: अशोक चिंचोले
सांज दैनिक : मंगळवार - १२ सप्टेंबर २०२३
वर्ष - ३७ वे
अंक - १६०
पाने - ४
किंमत २ रूपये
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com

लातूर - नाशिक
दररोज
रात्री ८.३० वाजता
GET IT ON Google Play
VISHWA TRAVELS APP
विश्व ट्रॅव्हल्स
२, उद्योग भवन कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर, लातूर.
संपर्क : (02382) 242790, 254002, 249329,
88888 45403, 88888 45404.
जिथं प्रवासाची व्याख्याच बदलते
Online Booking : www.vishwatravels.in

# मराठवाडा मॅरेथॉन, लातूरकर धावले

## पुष्पा राठोड, आदित्य पवार विजेते



लातूर : मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जिल्हा प्रशासनाने आयोजित केलेल्या 'मराठवाडा मॅरेथॉन लातूर २०२३'ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते तिरंगी फुगे हवेत सोडून नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणातून मॅरेथॉनला सुरुवात झाली.

सामान्य प्रशासनचे उपजिल्हाधकारी गणेश महाडिक, रोहयोच्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, नगरपालिका प्रशासनचे उपायुक्त रामदास कोकरे, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, प्रभारी तहसीलदार गणेश सरवदे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

'रन फॉर हुतात्मा, रन फॉर मराठवाडा' हे घोषवाक्य असलेल्या या मॅरेथॉनमध्ये लातूरकरांनी सहभाग नोंदविला. युवक, खेळाडूंसह विद्यार्थी, महिला, शासकीय अधिकारी व कर्मचारी यावेळी मोठ्या संख्यने उपस्थित होते. मॅरेथॉनपूर्वी आयोजित झुंबा डान्समध्ये सर्व उपस्थितांनी संगीताच्या तालावर आपले कौशल्य दाखविले. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनीही यामध्ये सहभागी होत उपस्थितांचा उत्साह वाढविला.नवीन जिल्हाधिकारी कार्यालयांच्या प्रांगणातून सुरू झालेली ही मॅरेथॉन पीव्हीआर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौकमार्गे जिल्हा क्रीडा संकुल येथे आल्यानंतर मॅरेथॉनचा समारोप झाला.

मराठवाडा मुक्तिसंग्रामात अनेकांचे महत्वपूर्ण योगदान आहे. या मुक्तिसंग्रामाच्या जाज्वल्य इतिहासाचा आपल्याला अभिमान आहे. हा इतिहास पुढील पिढीला सांगणे आवश्यक आहे. मराठवाडा मुक्तिसंग्रामातील हुतात्म्यांचे स्मरण ठेवून त्यांच्या कार्याची जाणीव प्रत्यकाने ठेवावी, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी मॅरेथॉनच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना सांगितले.

जिल्हा प्रशासनाच्यावतीने आयोजित 'मराठवाडा मॅरेथॉन लातूर २०२३'मध्ये महिला गटात पुष्पा राठोड आणि पुरुष गटात आदित्य पवार यांनी विजेतपद पटकाविले. तसेच पुरुष गटात ओंकार तेलंगे आणि अजय राठोड यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. महिला गटात श्रावणी जगताप हिने द्वितीय, तर राजनंदिनी सोमवंशी यांनी तृतीय क्रमांक पटकाविला.

जिल्हा क्रीडा संकुल येथे सामान्य प्रशासनचे उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, नगरपालिका प्रशासनचे उपायुक्त रामदास कोकरे, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, रेणापूरच्या तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड, लातूरचे प्रभारी तहसीलदार गणेश सरवदे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक वितरीत करण्यात आले. मॅरेथॉन पूर्ण करणाऱ्यांचाही प्रोत्साहनपर बक्षीस देवून यावेळी सन्मान करण्यात आला.

# लम्पी आजाराचा प्रादुर्भाव पोळा घरातच साजरा करा



## पशुसंवर्धन विभागाचे आवाहन

लातूर : जिल्ह्यात लम्पीचा चर्मरोगाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने गोवंशाच्या सर्व जिल्हांतर्गत अथवा जिल्हा बाहेर वाहतुकीला प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच सर्व पशुधनाच्या बाजारांमध्ये गोवंशाच्या खरेदी-विक्रीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी १४ सप्टेंबर २०२३ रोजी होणारा पोळा सण सार्वजनिक स्वरुपात साजरा न करता घरीच साजरा करण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे.

लम्पी चर्मरोगाच्या प्रादुर्भावावर नियंत्रण आणण्यासाठी गोवंश एकत्र जमा होण्याला प्रतिबंध करणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्ह्यात पशुधन बाजारासह त्यांच्या वाहतुकीवर निर्बंध आहेत. अशा परिस्थितीत पोळा सणानिमित्त गोवंशातील बैल गावामध्ये एकत्र जमा होण्याची शक्यता आहे. यामुळे लम्पी रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असल्याने पशुसंवर्धन विभागामार्फत सर्व पशुपालकांना व शेतकऱ्यांना पोळा हा सण घरातच साजरा करण्याचे आवाहन केले आहे. तसेच लम्पी रोगाच्या लसीकरणापासून एखादाही गोवंश वंचित राहिल्यास त्याच्यामार्फत गावामध्ये रोग प्रादुर्भाव होऊ शकतो. त्यामुळे सर्व पशुपालकांनी जागृत राहून नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून आपल्या पशुधनाचे लम्पी लसीकरण करून घेण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागांने केलेले आहे. एखाद्या पशुला लम्पी रोगाचा संसर्ग झाल्यास त्याचे तत्काळ विलगीकरण करून त्याला इतर पशुधानापासून दूर ठेवावे. तसेच नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून उपचार सुरु करावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी केले आहे.

# आरक्षणाचं पत्र हातात पडेल तेंव्हाच थांबू-मनोज जरांगे पाटील



जालना : मराठा आरक्षणासंदर्भात सरकार वारंवार वेळ मागून घेत आहे. आज पुन्हा एक महिन्याचा वेळ राज्य सरकारने निर्णय घेण्यासाठी मागीतला आहे. समाजाने ४० वर्षे वेळ दिला. तुम्हाला एक महिना वेळ कशासाठी हवाय? असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी आज उपोषण चालूच ठेवण्याचा निर्धार केला.

आंतरवाली सराटी, ता. अंबड येथे मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण चालू आहे. आज संदीपान भूमरे, अर्जुन खोतकर यांनी जरांगे पाटील यांची भेट घेवून काल झालेल्या बैठकीची प्रत त्यांना दिली. यावर जरांगे पाटील यांनी ग्रामस्थासोबत बैठक होईल. त्यात जो निर्णय घेण्यात येईल तो मुख्यमंत्र्यांना कळवू, असे त्यांनी बजावले. दरम्यान, मंत्री उदय सामंत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विशेष संदेश घेवून आंतरवालीकडे निघाल्याचे वृत्त आहे.

समाजाच्या हितासाठी हा लढा उभारला आहे. गेल्या पाच दशकापासूनचा हा प्रश्न आहे. मी पारदर्शकपणानं निर्णय घेतो. तुम्ही फक्त घोषणा देऊ नका, आरडाओरडा करण्यात मराठ्यांच्या पोरांचं हित नाही, असं मनोज जरांगे म्हणाले. आपल्याला एका विचारानं राहायला पाहिजे. मी समाजासाठी पारदर्शकपणे काम करत आहे, असं जरांगे म्हणाले.

भारत स्वतंत्र झाल्यापासून एकदाही सर्वपक्षांची बैठक झाली नव्हती. सर्व पक्षांनी एकत्र येऊन मराठा आरक्षणाच्या ठरावावर बैठक घेतली. मराठा समाजानं तुमचा मान सन्मान वाढवण्यासाठी काम केलं. मराठ्यांचा मुलगा बरबाद होत आहे. सगळ्यांनी एकत्र येऊन मराठा पोरांच्या बाजूनं उभं राहा, असं मनोज जरांगे म्हणाले. महाराष्ट्रात आंदोलनाच्या ज्या केसेस झाल्या होत्या त्या मागं घेण्याचा निर्णय घेण्यात आला. अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करणार असल्याचं सरकारनं सांगितलं. ज्यांनी लाठीमार केले ते सर्व निलंबित होणार, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

बाकी सगळं झालं आरक्षणाचं काय? असा सवाल मनोज जरांगे यांनी केला. सरकारला दोन दिवस वेळ दिला, पुन्हा चार दिवस वेळ दिला समाज काय म्हणला नाही. सरकारला वेळ दिला काय अन् नाय दिला काय हा आरक्षण घेतल्याशिवाय थांबत नाही, हे समाजाला माहिती आहे.

# अपघात झालेल्या वाहनातील साडेसात लाखाचे मनुके चोरीला

अहमदपूर : अहमदपूर-नांदेड रोडवर सांगवी शिवारात मन्याड नली पुलाजवळ दोन वाहनांचा अपघात झाला. अपघातानंतर लोक मारतील म्हणून एका वाहनाचा चालक पळून गेला. दरम्यान, या वाहनात असलेले सुमारे साडेसात लाख रूपयांचे मनुक्याचे बॉक्स कोणीतरी अज्ञाताने चोरून नेले आहे. या प्रकरणी त्या चालकाच्या फिर्यादीवरून अहमदपूर पोलिसांत अज्ञात चोरट्याच्या विरोधात चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

एम.एच.४५-एएफ-७८६१ या आयशर टेम्पोमध्ये मनुक्याचे ४०० बॉक्स होते. या टेम्पोचा व एम.एच. २६-बीसी-९४४४ या कारचा अपघात झाला. अपघात होताच आयशर टेम्पोचा चालक मंगेश चंद्रकांत पिसे रा. पाटील गल्ली, गावभाग सांगली हा अपघात होताच लोक मारतील या भितीने पळून गेला. नंतर येवून पाहतो तर त्यात आयशर टेम्पोमधील मनुक्याचे सर्व ४०० बॉक्स किंमत रूपये ७ लाख ४२ हजार ९६० रूपयांचे चोरून नेल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी मंगेश पिसे यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याच्या विरोधात अहमदपूर पोलिसांत चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




# आरक्षणासाठी चुकीच्या, घटनाबाह्य प्रथा पाडू नका

## - ॲड. आण्णाराव पाटील

लातूर : आरक्षण मिळविण्यासाठी आज विविध समाज सरकारवर दबावतंत्राचा वापर करून चुकीच्या व घटनाबाह्य प्रथा पाडत आहे. हा प्रकार म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहलेल्या घटनेचा अवमान आहे. तेंव्हा सरकारने आरक्षणासाठी कोणत्याही दबाव तंत्राखाली दडपणाखाली न येता घटनेनुसार काम करावे, असे आवाहन महाराष्ट्र विकास आघाडीचे संस्थापक अध्यक्ष ॲड. आण्णाराव पाटील यांनी आज लातूर येथे आयोजीत पत्रकार परिषदेत केले आहे.

मराठा, धनगर, मुस्लीम या समाजाच्या आरक्षणाला आमचा विरोध नाही. मात्र, त्यासाठी घटनेची पायमल्ली करून सरकारला काही तरी करण्यास भाग पाडणे या चुकीच्या पद्धती आहेत. घटनेने कोणाला आरक्षण द्यायचे, कोणाचे आरक्षण काढून घ्यायचे हे सर्व अधिकार संसदेला दिले आहेत. संसद ही भारतीय घटनेवर आधारीत कामकाज करते. असे असताना अनेक संघटना आरक्षणासाठी दबावतंत्राचा वापर करत आहेत. सरकारने दबावाखाली येऊ नये, असे आवाहन ॲड. आण्णाराव पाटील यांनी करून आरक्षण ज्या जाती, समुहाला देण्यात येते किंवा येईल अशा जात व समाजातील प्रस्थापितांनी स्वतःहून आरक्षण नाकारावे, असेही आवाहन ॲड. आण्णाराव पाटील यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस महाराष्ट्र विकास आघाडीचे ॲड. आण्णाराव पाटील, बसवंतअप्पा उबाळे, ॲड. अनिरूद्ध येचाळे, नाजम शेख, इस्माईल फुलारी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# तरूणाच्या हातातून मोबाईल हिसकावला

लातूर : लातूर येथील माऊली रोड मुंडे हॉस्पीटल शेजारून एक तरूण मोबाईलवर बोलत चालला असताना पाठीमागून आलेल्या दोघा जणांनी त्याच्या हातातील मोबाईल जबरदस्तीने हिसकावून घेतला.

संतोष व्यंकट कोहाळे रा. हरेगाव, ता. औसा हा. मु. दुर्वांकुर रेसीडन्सी, माऊली रोड हे मोबाईल कानाला लावून हॉटेल पार्थकडे बोलत जात असताना सायंकाळी पाठीमागून आलेल्या दोघा जणांनी त्यांच्या हातातील मोबाईल (किं. २१,५००/-) जबरदस्तीने हिसकावला. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गोदामाचा पत्रा कापून ४.७९ लाखाचा किराणा माल लंपास

गातेगाव : मौजे चिंचोली बल्हाळनाथ येथील महादेव मंदिराच्या पश्चिम बाजूस असलेल्या किराणा मालाच्या गोदामाचा मागील बाजूचा पत्रा कापून चोरट्यांनी या गोदामातील ४ लाख ७९ हजार ८३० रूपयांचा किराणा माल चोरून नेला आहे.

संतोष रंगनाथ कणसे रा. चिंचोली ब., ता. लातूर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याच्या विरोधात चोरीचा गुन्हा गातेगाव पोलिसांत दाखल करण्यात आला आहे. १० सप्टेंबरच्या रात्री चोरट्यांनी ही चोरी केली आहे.

## त्यांच्या मते....

▣ सरकार कोणालाही फसवणार नाही. टिकणारं आरक्षण देण्याची सरकारची भूमिका.
- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

त्यासाठी राज्याला टिकणारं सरकार हवयं

▣ ठाकरे सरकार संकटात असताना राष्ट्रवादीच्या ५२ आमदारांनी स्वत:च्या सहिनिशी सत्तेत सहभागाचे पत्र दिले होते. हे खरे नसेल तर मी राजकारणातून संन्यास घेईन. - अजितदादा पवार

कुटुंबातील गुपीतं जाहीर करून काकाच संकटात सापडतील.

▣ राज्यातील संपूर्ण मराठा समाजाला कुणबी हा दाखला देणे कायद्याच्या चौकटीत बसणार नाही.
- राधाकृष्ण विखे पाटील

हे कायद्याचे राज्य आहे.

▣ प्रशासनाची कार्यपद्धती सुधारण्यासाठी राज्य सरकार नवा सुशासन कायदा आणणार.
- एक बातमी

आहे त्या कायद्याची योग्य अंमलबजावणी करा. टी. एन. शेषन यांनी तेच केले होते.

# शेतातील शेडमधून ५ बकरे चोरले

शिरूर अनंतपाळ : मौजे डोंगरगाव (बोरी), ता. शिरूर अनंतपाळ येथील शेत शिवारात असलेल्या पत्र्याच्या शेडमधून चोरट्यांनी दोन शेळ्या व तीन बकरे चोरून नेले आहेत.

अरूण शिवराम सूर्यवंशी रा. डोंगरगाव यांच्या शेतातील शेडसमोर असलेल्या दोन शेळ्या व तीन बकरे (किं. ५० हजार रूपये) ९ सप्टेंबरच्या रात्री चोरट्यांनी चोरून नेले आहेत. शिरूर अनंतपाळ पोलीस अधिक तपास करत आहेत.

# रत्नाबाई पावले यांचे वृद्धापकाळाने निधन



लातूर : वृत्तछायाचित्रकार नारायण (तम्मा) पावले यांच्या मातोश्री रत्नाबाई चंद्रशेखर पावले (वय ७० वर्षे) यांचे सोमवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर आज मंगळवारी सकाळी लिंगायत स्मशानभूमी, सिध्देश्वर मंदिर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. रत्नाबाई पावले यांच्या पश्चात पती,सुरेश व नारायण ही दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. यावेळी विविध पक्ष, संघटना, पत्रकार, नातेवाईक, मित्र परिवार उपस्थित होता.

# मराठा आरक्षणासाठी ग्रामपंचायतने ठराव करावा- मागणी




तपसे चिंचोली : जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ मौजे तपसे चिंचोली (ता. औसा, जि. लातूर) येथील सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालय तपसे चिंचोली यांना निवेदनाद्वारे तात्काळ विशेष ग्रामसभा बोलावून मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत ठराव घेण्यात यावा व त्याची माहिती शासनाकडे त्वरित कळवावी अशी मागणी निवेदनाद्वारे ग्रामपंचायतला ११ सप्टेंबर २०२३ सोमवारी कळवण्यात आली आहे.

जोपर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळणार नाही तोपर्यंत राजकिय नेत्यांना गावबंदी व आगामी निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा आक्रमक पवित्रा घेण्यात येणार असल्याचे निवेदनाद्वारे ग्रामपंचायतला कळवण्यात आले आहे.

यावेळी ग्रामपंचायतचे उपसरपंच युवराज यादव, योगेश गरड, नामदेव दळवे, जयशंकर मोरे, नितीन येरनुळे, सिद्धेश्वर बलसुरे, शंकर येरनुळे, नाना पळसे, शिवशंकर येरनुळे, राजकुमार शिंदे, मुन्ना गरड, प्रशांत कुलकर्णी, राम येरनुळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



श्री गणेश चतुर्थी काही दिवसांवर आल्याने लातुरात सार्वजनिक ठिकाणी बसवण्यात येणाऱ्या गणेशाच्या मूर्तीवर मंडळाचे कार्यकर्ते कलाकूसर करताना दिसत आहेत. (फोटो प्रकाश कंकाळ)

# आरोग्य



## वजन कमी करण्यासाठी फायदेशीर पपई, इतर फायदे जाणून घ्या

पपई हे वर्षाचे बाराही महिने सहज उपलब्ध होणारे फळ आहे. अगदी कमी किमतीत उपलब्ध असल्याने आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. पपई केवळ पचनसंस्थेसाठी चांगली मानली जात नाही तर वजन कमी करण्यासही ते उपयुक्त आहे. पपईचे इतर फायदे जाणून घेऊ या.

कमी कॅलरीज–पपई हे एक फळ आहे ज्याच्या कॅलरीजची संख्या खूप कमी आहे. म्हणून, जेव्हा तुम्ही ते सेवन करता तेव्हा तुम्हाला पोट भरल्यासारखे वाटते परंतु तुमच्या कॅलरीजची संख्या विस्कळीत होत नाही. मधल्या जेवणात पपई खाल्ल्याने तुम्हाला अनहेल्दी स्नॅकिंग टाळण्यास मदत होते.

अधिक फायबर समाविष्ट – पपईमध्ये आहारातील फायबर चांगल्या प्रमाणात आढळते. ज्यामुळे पपई जास्त काळ पोट भरते. फायबरमुळे, तुम्ही जास्त खाणे टाळता आणि ते कॅलरी सेवन संतुलित करण्यास मदत करते. ज्यामुळे तुमचे वजन कमी करणे सोपे जाते.

चांगले हायड्रेशन करते– पपई खाण्याचा एक फायदा म्हणजे त्यात पाण्याचे प्रमाण जास्त असते. यामुळे तुम्हाला स्वतःला हायड्रेट ठेवण्यात मदत होते. तुम्हाला कदाचित हे माहित नसेल, परंतु काहीवेळा तुमचे शरीर भुकेने तहान भागवते आणि यामुळे तुम्हाला जास्त खाणे भाग पडते. म्हणून, जेव्हा तुम्ही पपई खाता तेव्हा ते तुम्हाला हायड्रेटेड राहण्यास मदत करते, त्यामुळे अनावश्यक स्नॅकिंग टाळते.

चरबी कमी करते– ज्याप्रमाणे पपईमध्ये कॅलरीज कमी असतात, त्याचप्रमाणे ते फॅट फ्री असते. म्हणून, जेव्हा पपईचा आहारात समावेश केला जातो तेव्हा ते तुम्हाला तुमच्या चरबीचे प्रमाण कमी करण्यास मदत करते आणि त्यामुळे वजन कमी करणे खूप सोपे होते.

पचनास मदत करते– पपईमध्ये पपेन आणि काइमोपैपेन असतात, जे पचनास मदत करतात आणि बद्धकोष्ठता दूर करतात. एवढेच नाही तर पोटातील अल्सर रोखण्यात आणि त्यावर उपचार करण्यातही मदत होऊ शकते. निरोगी आतडे आणि पचनसंस्था वजन कमी करण्यासाठी उपयुक्त मानली जाते.

## शुगरवर कंट्रोल ठेवण्यासाठी हे टाळा

डायबेटिसच्या रुग्णांनी खाण्यापिण्याबाबत विशेष पथ्य पाळणे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीचे अत्यंत महत्त्वाचे असते.



शुगर कंट्रोलमध्ये ठेवण्यासाठी काही गोष्टी आवश्यक असतात. त्यासाठीच या टिप्स –

साखरयुक्त पदार्थ, मध, सरबत, सीरप, कोल्ड ड्रिंक्स, गूळ, तुप, केक, पेस्ट्री, आईसक्रीम, दारू, बीयर आदींचे डायबेटिस झालेल्या रुग्णांनी सेवन करू नये.

ज्या भाज्या जमिनीत येतात, उदा. बटाटे, रताळू, इत्यादी भाज्या खाणे टाळाव्यात.

केली, चीकू, आंबा, सीताफल, द्राक्ष, पपई, पेरू, ऊस आदी फळे वर्ज्य करावीत.

काजू, मनुका, बदाम, भुईमुगांच्या शेंगा, अख्रोड आदी सुकामेवा टाळावा.

मांसाहर टाळावा.

भात, वरण, दूध, पनीर, दही, मासे विचडा आदी पदार्थ कमी प्रमाणात खावेत.

कच्च्या भाज्या उदा. मेथी, पालक, दूधी भोपळा, मुळा, कोथिंबिर, गोभी, चवळी, टमाटर, कांदा, कारले, कांद्याची पात, कैरी, लिंबू पाणी आदी पदार्थ भरपूर प्रमाणात खावे.

विशेष फायदेशीर

कारले, कडूलिंब, मेथीदाना यांचा काढा दररोज प्यावा.

सकाळच्या पहरी मोकळ्या हवेत फिरावे.

जास्त तणावात राहू नये.

जागरण कमी करावे.

## डिप्रेशन आणि काळजी दूर करण्यासाठी करा या मसाल्यांचे सेवन





रिसर्चमध्ये असे आढळून आले आहे की बरेच खाद्य पदार्थ असे आहे जे तुमचे मूड फ्रेश करतात आणि तुम्हाला आनंदीही करतात. हे खाद्य पदार्थ तुमच्या शरीरात काही हार्मोन्सचा स्राव करतात ज्याने तुम्हाला आनंद मिळतो.

हे ही सिद्ध झाले आहे की खाण्यात या वस्तूंच्या कमतरतेमुळे तुमचे मन स्थिर राहत नाही आणि तुम्हाला डिप्रेशन किंवा काळजी राहते. पण काय तुम्हाला माहीत आहे की काही मसाले असे ही आहे जे आम्हाला एनर्जी देतात आणि आनंदी ही ठेवतात?

सर्वात आधी मन प्रसन्न ठेवणारी वस्तू आहे कलमी (दालचिनी). यात एक निश्रि्चत साखरेची सुगंध असते ज्याने तुम्हाला जास्त साखर खाण्याची इच्छा होत नाही. हे मेंदूला उत्तेजित करण्यासाठी उत्तम मानले जाते तसेच स्मरणशक्ती वाढवण्यात आणि मेंदूला केंद्रित ठेवण्यास मदतगार ठरते. ही मूड बनवणारी वस्तू आहे.

पुढची औषधी आहे जो तुमचा मूड बनवू शकते ती आहे केशर. हा आनंद वाढवणारा मसाला आहे. रिसर्चमध्ये असे आढळून आले आहे की केशर एक चांगला



तनावरोधी आहे. हे मन प्रसन्न करणारे आणि तणाव दूर करण्याचा सर्वात उत्तम समाधान आहे.

पिवळी हळद मन खूश ठेवण्यासाठी मानली जाते. यात एंटी–इन्फ्लामेट्री आणि एंटी–ऑक्सीडेंट्स प्रचूर मात्रेत असते. ही हळद मनाला उत्तेजित करणार्या सेरोटोनिनला वाढवते.



## गुणकारी भोपळा

भोपळा ही अनेकांची नावडती भाजी, भरीत, कोशिंबिर, सूप असे पदार्थ भोपळ्यपासून बनवले जातात. कितीही नावडता असला तरी गुणधर्मामुळे थोड्या प्रमाणात का होईना, परंतु प्रत्येकाने भोपळा खायलाच हवा. चेहर्यावर पडणार्या सुरकुत्यांपासून पोटाच्या गंभीर विकारांवर भोपळा गुणकारी ठरू शकतो. भोपळ्याच्या अशाच काही औषधी गुणधर्माबाबत जाणून घेऊ.

भोपळ्यात 'बिटा करोटिन' या घटकाचं प्रमाण बरंच जास्त असतं. यामुळे भोपळा हा अ जीवनसत्त्वाचा समृद्ध स्त्रोत मानला गेलाय. बीटा केरोटिनमधील ऑंटिऑक्सिडंट्समुळे शरीरातील फ्री रेडिकल्सचा सामना अगदी सहज करता येतो.

भोपळा हे तापावरचं औषध आहे.

भोपळ्यातील विशिष्य प्रकारच्या खनिजांमुळे मेंदूच्या नसांना आराम मिळतो.

हृदयरोग्यांसाठी भोपळा वरदान मानला जातो. भोपळ्यात कोलेस्ट्रॉल कमी करण्याची क्षमता असते.

आतड्यांच्या आरोग्याच्या दृष्टीनंही भोपळा गुणकरी मानला जातो. भोपळ्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहते.

बहुसंख्य महिलांमध्ये लोहाची कमतरता आढळते. अशा महिलांनी भोपळ्याच्य बियांचं सेवन करावं. भोपळ्याच्या बियांमध्ये लोह, झिंक, पोटेशियम आणि मॅग्नेशियम यांचं प्रमाण भरपूर असल्यानं बरेच लाभ होतात.

पोटाच्या विविध विकारांवर भोपळा गुणकारी ठरू शकतो. यातील फायबरमुळे पचनक्रिया सुधारते आणि पोट स्वच्छ झाल्याने अनेक रोगांना दूर ठेवता येतं.

## वेट लॉस करण्यासाठी फायदेशीर आहे मशरूम, अशा प्रकारे सेवन करा

आजच्या काळात लठ्ठपणा ही लोकांसाठी एक गंभीर समस्या बनली आहे. चुकीच्या खाण्यापिण्याच्या सवयी आणि अस्वास्थ्यकर जीवनशैलीमुळे मोठ्या प्रमाणात लोक लठ्ठ होत आहेत. त्याचबरोबर वाढलेले वजन कमी करण्यासाठी अनेकजण खूप प्रयत्न करतात. काही लोक डाएटिंगचा अवलंब करतात, तर काहीजण जिममध्ये तासनतास घाम गाळण्यात घालवतात. मात्र त्यानंतरही योग्य परिणाम होत नाही आणि त्यांची निराशा होते. काही लोक वजन कमी करण्यासाठी अनेक गोष्टी त्यांच्या आहारातून वगळतात.

पण काही अशा गोष्टी आहे ज्यांना आपल्या आहारात समाविष्ट करून आपण वेट लॉस करू शकता. त्यापैकी एक आहे मशरूम. मशरूम हे आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते. प्रथिने, फायबर, कॅल्शियम, पोटॅशियम, व्हिटॅमिन–बी, व्हिटॅमिन–डी, झिंक, सेलेनियम आणि अँटीऑक्सिडंट्स यांसारखे अनेक पोषक घटक मशरूममध्ये मुबलक प्रमाणात आढळतात. त्याच वेळी, त्यात खूप कमी कॅलरी असतात. त्यामुळे तुमचे वजनही नियंत्रणात राहते. वजन कमी करण्यासाठी मशरूमचे सेवन किती फायदेशीर आहे आणि त्याचे सेवन कसे करावे जाणून घेऊ या.

**नाश्त्यात मशरूमचा समावेश करा–** वजन कमी करण्यासाठी तुम्ही नाश्त्यात मशरूम खावे. यासाठी तुम्हाला मशरूमचे छोटे तुकडे करावे लागतील. नंतर त्यात ओट्स आणि दलिया मिक्स करून सेवन करा. दुसरीकडे, जर तुम्ही अंडी खात असाल तर तुम्ही मशरूम ऑम्लेट बनवून खाऊ शकता. मशरूम ऑम्लेट देखील सामान्य ऑम्लेटप्रमाणेच तयार केले जाते. नाश्त्यात मशरूमचे सेवन केल्याने तुम्हाला वारंवार खाण्याची इच्छा होत नाही. यामुळे तुमचे वजन कमी करणे सोपे होईल.

**मशरूम सूप–** वजन कमी करण्यासाठी तुम्ही मशरूम सूपचे सेवन करावे. मशरूम सूप बनवणे खूप सोपे आहे. मशरूम सूप बनवण्यासाठी कांदा, गाजर, आले, मशरूम आणि लसूण बारीक चिरून घ्या. आता एका कढईत तूप गरम करून त्यात आले आणि लसूण घालून परतून घ्या. यानंतर कांदे, गाजर आणि मशरूम घालून २–४ मिनिटे परतून घ्या. आता चवीनुसार पाणी आणि मीठ घाला. अशा प्रकारे तुमचे सूप तयार होईल. वर चिमूटभर काळी मिरी घाला. या सूपचे दररोज सेवन केल्यास वजन कमी होण्यास मदत होईल.

**मशरूम स्टर फ्राय –** वजन कमी करण्यासाठी तुम्ही तुमच्या आहारात मशरूम स्टर फ्रायचाही समावेश करू शकता. हे करण्यासाठी, गाजर, कांदे, कोबी, मशरूम आणि टोमॅटोचे बारीक तुकडे करा. आता कढईत एक चमचा तूप गरम करून त्यात आले आणि लसूण परतून घ्या. नंतर त्यात



बारीक चिरलेल्या भाज्या टाका आणि किमान ५ ते ७ मिनिटे मध्यम आचेवर शिजवा. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही त्यात चीजचे तुकडेही घालू शकता. यानंतर त्यामध्ये काळी मिरी पावडर, मीठ आणि लिंबाचा रस घालून मिक्स करा. २–३ मिनिटे शिजल्यानंतर गॅस बंद करा. अशाप्रकारे तुमचे मशरूम स्टर फ्राय तयार होईल. अशा प्रकारे तुम्हाला चव मिळेल आणि वजन कमी होण्यास मदत होईल.

**मशरूम ची भाजी –** वजन कमी करण्यासाठी मशरूमची भाजी खाणे फायदेशीर ठरू शकते. मशरूममध्ये भरपूर फायबर असते. ज्यामुळे तुमचे पोट जास्त काळ भरलेले राहते. त्याचबरोबर मशरूममध्ये असलेले पोषक तत्व तुमच्या शरीराला ऊर्जा देण्याचे काम करतात. यासोबतच हे वजन कमी करण्यासही मदत करते. मशरूम करी बनवण्यासाठी कमीत कमी प्रमाणात तूप किंवा तेल वापरा.

## गर्भधारणेदरम्यान ही लक्षणे दिसल्यास गर्भात असू शकतात जुळी मुले, अशा प्रकारे ओळखा



काही स्त्रियांना जुळी मुले होतात. अनेक प्रकरणांमध्ये, गर्भवती महिलेला सुरुवातीला लक्षात येत नाही की तिच्या पोटात एक नाही, तर दोन मुले आहेत. सोनोग्राफीद्वारेच जुळ्या मुलांचा शोध लावता येतो, पण तुम्हाला माहित आहे का की जर गर्भात जुळी मुले असतील, तर त्याची लक्षणे सुरुवातीच्या काळातही ओळखता येतात. या लक्षणांबद्दल सविस्तर जाणून घेऊया. अंडी दोन भिन्न शुक्राणूंद्वारे फलित झाल्यावर जुळी मुले जन्माला येतात, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. पोटात जुळी मुले असतील, तर त्याची लक्षणेही गर्भधारणेदरम्यान दिसू लागतात. जर पोटात जुळी मुले असतील तर स्त्रीला मॉर्निंग सिकनेस (मळमळ) होतो. सहसा ही लक्षणे मासिक पाळीच्या दुसऱ्या महिन्यात दिसून येतात. हे सर्वात पहिले लक्षण आहे. तथापि, बहुतेक प्रकरणांमध्ये महिलांना ते ओळखता येत नाही.

स्त्रीरोग तज्ज्ञ सांगतात की बहुतेक प्रकरणांमध्ये, महिलांना कोणतीही तपासणी न करता त्यांच्या पोटात जुळी मुले घेऊन जात असल्याचे समोर येत नाही. सोनोग्राफी केल्यानंतरच ही माहिती मिळू शकते, मात्र काही लक्षणे गर्भात एक नाही, तर दोन मुले असल्याचे निश्रि्चतपणे सूचित करतात. मॉर्निंग सिकनेस व्यतिरिक्त, दुसरे सर्वात मोठे लक्षण म्हणजे स्त्रीचे वजन सामान्यपेक्षा जास्त वाढणे. जर एखादी स्त्री दोन मुलांसह गर्भवती असेल तर या काळात तिचे वजन वाढते. गर्भधारणेदरम्यान सामान्य महिलेचे वजन २० किलोपर्यंत वाढते, तर जुळ्या मुलांच्या बाबतीत ते ३० किलोपर्यंत वाढू शकते.

जर एखाद्या महिलेला गरोदरपणात जास्त भूक लागत असेल, तर हे लक्षण आहे की गर्भात दोन मुले आहेत. अधिक पोषणाच्या गरजेमुळे, स्त्रीला देखील जास्त भूक लागते. सकाळी उठल्याबरोबर खूप भूक लागते आणि दिवसातून अनेक वेळा काहीतरी खावेसे वाटते. या काळात फास्ट फूडचे सेवन टाळावे हे लक्षात ठेवा. आपल्या आहारात प्रथिने आणि जीवनसत्त्वे घ्या. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आहाराचे नियोजन करा. बाहेरचे खाणे टाळा. यामुळे संसर्ग होण्याचा धोका असू शकतो. जुळ्या मुलांच्या बाबतीत स्त्रीला खूप थकवा जाणवतो. असे घडते कारण स्त्रीचे शरीर दोन मुलांच्या शरीराचे पोषण करण्याचे काम करत आहे. सोनोग्राफीतून योग्य माहिती मिळू शकत असली, तरी ही सर्व लक्षणे स्त्रीला जुळी मुले गर्भवती असल्याचे सूचित करतात.

## एलोवेरा ज्यूस पिण्याचे होतात 'हे' जबरदस्त फायदे

एलोवेराचे फायदे आजकाल सर्वांनाच माहिती आहेत. बहुतांश लोक एलोवेराला ब्युटी बेनिफिट्ससाठी वापर करतात. मात्र तुम्हाला माहितेय का, याचा एकूणच आरोग्यावर ही सकारात्मक फायदा होतो. एक्सपर्ट्सच्या मते, एलोवेरा ज्यूसचा डाएटमध्ये समावेश केल्यास काही समस्या दूर होऊ शकतात. अशातच एलोवेरा ज्यूसमुळे कोणते फायदे होतात याच बद्दल आपण जाणून घेऊयात.

**कब्जसाठी फायदेशीर**

एलोवेरा ज्यूस प्यायल्याने कब्जच्या समस्येपासून आराम मिळू शकतो. एक्सपर्ट्सच्या मते, यामध्ये फायबर आणि अँन्टीऑक्सिडेंट्सचे प्रमाण अधिक प्रमाणात असते. यामध्ये वॉटर कंटेट ही अधिक असतो. अशातच यामुळे पाचनक्रिया सुधारण्यास मदत होते. या व्यतिरिक्त लॅक्सेटिव्ह असते. अशातच कब्जची समस्या असेल तर तुम्ही एलोवेरा ज्यूस पिऊ शकतात.

**डोळ्यांसाठी फायदेशीर**

एलोवेरा ज्यूस डोळ्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते. यामध्ये बीटा कॅरेटीनचे प्रमाण अधिक असते. जे एक अँन्टीऑक्सिडेंटच्या रुपात नारंगी किंवा पिवळ्या रंगाच्या भाजीत आढळते. तुमचे शरीर बीटा कॅरोटीनला व्हिटॅमिन ए मध्ये बदलतो. हे व्हिटॅमिन एकूणच आय हेल्थसाठी फायदेशीर असते.

**मधुमेह**

एलोवेरा ज्यूस मधुमेहाच्या रुग्णांसाठी फार फायदेशीर असतो. एक्सपर्ट्सच्या मते, एलोवेरा रक्तातील शर्कराचा स्तर नियंत्रित करण्यात मदत करतो. एलोवेरा ज्यूस टाइप–२ मधुमेहाचे रुग्ण पिऊ शकतात.

**रोगप्रतिराकशक्ती वाढते**

एलोवेरात असलेल्या व्हिटॅमिन सी एकूणच आरोग्यासाठी गरजेचे असते. हे एक नैसर्गिक अँन्टीऑक्सिडेंट असतात जे सूजेच्या विरोधात लढण्यास मदत करतात.



## लहान मुलांमध्ये दिसली ही लक्षणे तर समजा डेंग्यू आहे, असे करा संरक्षण




देशभरात डेंग्यूच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. सततच्या पावसाने या आजाराची व्याप्ती आणखी वाढवली आहे. डेंग्यूमुळे रुग्णालयांमध्येही रुग्णांची संख्या वाढत आहे. काही प्रकरणांमध्ये रुग्णाचा मृत्यूही होतो. लहान मुलांमध्येही डेंग्यूचे प्रमाण वाढत आहे. लहान मुलांमध्ये डेंग्यूचे विविध प्रकार दिसून येत असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. काही मुलांमध्ये ऊ–२ स्ट्रेनची प्रकरणे देखील नोंदवली जात आहेत. अशा परिस्थितीत, मुलांमध्ये या रोगाची लक्षणे वेळेवर ओळखणे महत्वाचे आहे. लहान मुलांमध्ये डेंग्यूची लक्षणे प्रौढांपेक्षा काहीशी वेगळी असतात.

डेंग्यूचा संसर्ग एडिस डासांच्या चावण्याने होतो. डेंग्यूच्या D-2 स्ट्रेनची प्रकरणे देखील आढळतात. डी–२ हा डेंग्यूचा सर्वात धोकादायक प्रकार आहे. त्यामुळे शरीरातील प्लेटलेट्सची पातळी कमी होऊ लागते. त्यामुळे काही प्रकरणांमध्ये रुग्णाचा मृत्यूही होतो. लहान मुलांमध्ये डेंग्यूची लक्षणे गंभीर असू शकतात. लहान मुलांमध्ये डेंग्यूची लक्षणे काय आहेत, ते आम्ही तुम्हाला सांगत आहोत.

उच्च ताप : लहान मुलांमध्ये डेंग्यू झाल्यास खूप जास्त ताप येतो. ताप १०० अंशापेक्षा जास्त असतो आणि या काळात पोटात तीव्र वेदना होऊ शकतात.

नाकातून रक्तस्त्राव : तापासोबतच मुलाच्या नाकातून रक्त येत असेल, तर ते डेंग्यूचे धोकादायक लक्षण आहे. अशा परिस्थितीत मुलाला ताबडतोब रुग्णालयात नेले पाहिजे.

उलट्या आणि अतिसार : या ऋतूत होणारे उलट्या आणि जुलाब हे देखील डेंग्यूचे लक्षण असू शकते. तापासोबत हा त्रास होत असेल, तर ताबडतोब मुलाला डॉक्टरांकडे न्या.

तापात बेफिकीर राहू नका : याबाबत तज्ज्ञ सांगतात की या ऋतूमध्ये ताप आल्यास काळजी करू नये. हा ताप डेंग्यू, मलेरिया किंवा टायफॉइड असू शकतो. अशा स्थितीत जर मुलाला ताप आला असेल आणि त्याला दोन दिवसांपेक्षा जास्त काळ लोटला असेल, तर त्याची डेंग्यू किंवा मलेरियाची त्वरित तपासणी करा. या प्रकरणात स्वत: उपचार करण्याचा प्रयत्न करू नका. चाचणीत डेंग्यूची पुष्टी झाल्यास ताबडतोब रुग्णालयात जावे.

अशा प्रकारे करा रक्षण

मुलांना पूर्ण बाह्यांचे कपडे घाला

घरात पाणी साचू देऊ नका

रात्री मच्छरदाणी वापरा

ताप आल्यास तपासणी करा

लातूर भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
मंगळवार १२ सप्टेंबर २०२३



## गेल्या दीड वर्षामध्ये ३ लाख तरूणांना रोजगार दिला, मुख्यमंत्री शिंदे यांचा दावा

मुंबई : कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून गेल्या दीड वर्षांमध्ये तीन लाख उमेदवारांना रोजगार प्राप्त झाला आहे, असा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. भारत युवा देश म्हणून ओळखला जातो. युवकांना कौशल्य विकासाच्या, रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही ते म्हणाले. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत ४१८ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अभ्यासिकांच्या वर्गांचे ऑनलाईन उद्घाटन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

## मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्याच्या स्मृतींना पूर्णविराम नको

लातूर : आपल्यावर झालेल्या अन्याय-अत्याचारांची जाणीव जो समाज विसरतो तो बळी जातो. त्यामुळे अमृत महोत्सवा नंतर मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या स्मृतींना पूर्णविराम द्यायला नको, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम क्षेत्र प्रचार विभाग प्रमुख प्रमोद बापट यांनी व्यक्त केले.

सांस्कृतिक वार्तापत्र, पुणे,श्री केशवराज शैक्षणिक संकुल,लातूर आणि मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सव समिती,लातूर यांच्यावतीने लढा ! मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा ! हिंदूच्या संघर्षाची विजयगाथा या विशेषांकाचे प्रकाशन मुक्ताई मंगल कार्यालयात संपन्न झाले.यावेळी मार्गदर्शन करताना प्रमोद बापट बोलत होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. संतोष बीडकर यांनी प्रेरणागीत सादर केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा प्रचार व प्रसिद्धीप्रमुख नामदेव व्यंजने यांनी उपस्थित मान्यवरांचा परिचय करून दिला.महेश काकनाळे यांनी गायलेल्या संपूर्ण वंदे मातरमने कार्यक्रमाची सांगता झाली.या कार्यक्रमास शहर व जिल्ह्यातील मान्यवरांसह सर्व स्तरातील नागरिक व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी शासनाची-प्रा. डॉ तानाजी सावंत

उस्मानाबाद : राज्यातील साडेबारा कोटी जनतेच्या आरोग्याची काळजी घेणे व सर्वांनी आरोग्यदायी जीवन जगावे हा शासनाचा मानस आहे.म्हणूनच नागरिकांना मोफत आरोग्य शिबिराच्या माध्यमातून तसेच बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आणि शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत उपचार देऊन निरोगी आणि स्वस्थ जीवन जगण्याची दिशा देण्याचा शासनाचा मानस आहे. राज्यातील आरोग्य संस्थेत सर्व वृद्ध व्यक्तींची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येईल.औषधांच्या वाढत्या किंमती लक्षात घेता शासकीय दवाखान्यात जेनेरिक मेडिसिनची दुकाने सुरू करण्यात येतील.असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांनी केले.

आज ११ सप्टेंबर रोजी वाशी येथे दोन दिवसीय आयुष्यमान भव आरोग्य शिबिराच्या सांगता कार्यक्रमाप्रसंगी पालकमंत्री प्रा. डॉ. सावंत बोलत होते. वाशी येथील डॉ.कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, तपोवन वाशी येथे आयुष्यमान भव अभियान अंतर्गत आयोजित दोन दिवसीय महाआरोग्य शिबिरात १० व ११ सप्टेबर रोजी तब्बल १४८८३ नागरीकांनी आरोग्य तपासणीच लाभ घेतला.तर ६४१ रूग्णांना पुढील उपचारासाठी पाठवण्यात येणार आहे. तसेच २०१९ रुग्णांना चष्मे वाटप करण्यात आले. यावेळी आयुष्यमान कार्डाचे वाटप आरोग्य मंत्री प्रा.डॉ. सावंत यांचे हस्ते करण्यात आले.

पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजी सावंत पुढे म्हणाले,राज्याच्या साडेबारा कोटी जनतेच्या आरोग्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. राज्यातील दोन हजार ४१६ शासकीय दवाखान्यामध्ये वृध्दांना मोफत उपचार सुरू करणार येईल. औषधांच्या वाढलेल्या किमती लक्षात घेवून राज्यातील प्रत्येक शासकीय दवाखान्यात दोन हजार जेनेरिक मेडिसीनची दुकाने सुरू करण्यात येतील.तसेच आरोग्य सेवेत महत्वाची भुमीका बजावणा-या आशा सेविकांच्या कुटूंबीयांसाठी पाच लाखाचे विमा संरक्षण देणार असल्याचे ते म्हणाले.

कर्करोगग्रस्त रूग्णांना यापुढे मोफत उपचाराची सोय करणार असल्याचे सांगून प्रा.डॉ.सावंत पुढे म्हणाले,मराठा समाजाने आरक्षणासाठी टोकाचे पाऊल उचलू नये.शासन आरक्षणाबाबत लवकरच निर्णय घेईल. पर्जन्यमापक यंत्रावरील पावसाच्या नोंदी शिथील करून राज्य मंत्रीमंडळामध्ये निर्णय घेवून दुष्काळाबाबत निर्णय घेतला जाईल.

यावेळी जिल्हाधीकारी डॉ. सचिन ओंबासे,माजी जिप उपाध्यक्ष धनंजय सावंत,प्रशांत चेडे,शिवशक्ती भैरवनाथ साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक केशव सावंत,दत्तात्रय मोहिते,सत्यवान गपाट,सतिष शेरकर तसेच पुणे आरोग्य विभागातील उपसंचालक डॉ. राधाकिशन पवार, लातूरच्या उपसंचालक डॉ.अर्चना भोसले,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतिश हरिदास, प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.इस्माईल मुल्ला,जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. कुलदिप मिटकरी,निवासी वैदयकिय अधिकारी डॉ. शिवाजी फुलारी,डॉ. तानाजी लाकाळ,डॉ.सुशिल चव्हाण, तहसीलदार नरसिंग जाधव, गटविकास अधिकारी नामदेव राजगुरू,नगर पालिकेचे मुख्यधिकारी गिरीष पंडित, वैद्यकीय अधीक्षक डॉ. दयानंद क्वडे, डॉ.गोवर्धन महिंद्रकर, डॉ.जे.एन.सय्यद डॉ.अमोल शिनगारे, डॉ.रफीक अन्सारी, जमा.अमर तानवडे माजी नगराध्यक्ष नितीन चेडे, नागनाथ नाईकवाडी, शिवहार स्वामी, प्रविण गायकवाड,आन्नासाहेब जाधव यांचेसह अनेकांची उपस्थिती होती.

# गणेशोत्सव स्पर्धेत जास्तीत जास्त मंडळांनी १५ सप्टेंबरपर्यंत सहभाग नोंदवावा

## सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आवाहन

मुंबई : राज्य शासनाने १९ सप्टेंबर २०२३ पासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त मंडळांनी १५ सप्टेंबर २०२३ पर्यंत आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.

या स्पर्धेसाठी मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, ठाणे या जिल्ह्यांतून प्रत्येकी ३ व अन्य जिल्ह्यांतून प्रत्येकी एक या प्रमाणे उत्कृष्ट ४४ गणेशोत्सव मंडळांची निवड करण्यात येईल. या ४४ गणेशोत्सव मंडळांमधून राज्यातील पहिल्या क्रमांकाच्या उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळास पाच लाख रुपयांचे, द्वितीय क्रमांकास अडीच लाख रुपयांचे, तर तृतीय क्रमांकास एक लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. उर्वरित ४१ गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून प्रत्येकी २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात येईल.

उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेत सहभागी होण्यासाठी गणेश मंडळांना १५ सप्टेंबर २०२३ पर्यंत स्पर्धेत अर्ज करता येईल. mahotsav.plda.gmail.com या ई - मेलवर गणेशमंडळांनी अर्ज करावा. पु. ल. देशपांडे कला अकादमी तर्फे ई-मेलवर प्राप्त अर्ज संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाला १८ सप्टेंबरपर्यंत परीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात येईल. १९ ते २८ सप्टेंबर दरम्यान जिल्हास्तरीय समितीचे सदस्य स्पर्धेत सहभागी गणेशोत्सव मंडळांचे प्रत्यक्ष भेटी देऊन परीक्षण करतील. व्हिडिओग्राफी आणि कागदपत्रे तपासून अभिप्रायासह गुणांकन करतील.

जिल्हास्तरीय समिती जिल्ह्यातून एका उत्कृष्ट गणेश मंडळाची शिफारस १ ऑक्टोबरपर्यंत पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीला करेल. राज्यस्तरीय समिती राज्यातील उत्कृष्ट ३ गणेश मंडळाची शिफारस अकादमीला करेल. त्यानुसार कला अकादमी विजेत्या मंडळांची घोषणा करेल व १२ ऑक्टोबरला विजेत्या गणेश मंडळांना पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या ४ जुलै २०२३ रोजीच्या शासन निर्णयात स्पर्धेचा तपशील, स्पर्धा निवडीचे निकष नमूद केले आहेत. तसेच अर्जही उपलब्ध करून देण्यात आला आहे. अर्जाच्या या नमुन्यानुसार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी पु. ल. देशपांडे, महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या mahotsav.pldagmail.com या ई- मेल १५ सप्टेंबर २०२३ पर्यंत अर्ज करावा. या स्पर्धेत जास्तीत जास्त मंडळांनी सहभाग नोंदवावा, असेही आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी केले आहे.

# सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराची संधी; लातूर येथे बुधवारी मुलाखतींचे आयोजन

लातूर : नोकरीसाठी इच्छुक युवक-युवतींना नामवंत खासगी कंपन्या, कारखाने, उद्योगसमूह यांच्या माध्यमातून उत्तमोत्तम रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मार्गदर्शन केंद्रातर्फे प्रत्येक महिन्याला रोजगार मोहीम अर्थात 'जागेवरच निवड संधी'चे आयोजन करण्यात येत आहे. या अंतर्गत १३ सप्टेंबर २०२३ रोजी लातूर येथे मुलाखतींचे आयोजन करण्यात आले असल्याचे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त बा. सु. मरे यांनी कळविले आहे.

लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मार्गदर्शन केंद्र हे कार्यालय वेळोवेळी जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागात रोजगार मेळावे आयोजित करून, सर्व स्तरातील जास्तीत जास्त उमेदवारांना रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न करते. त्याचाच पुढील टप्पा म्हणून आता प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी 'जागेवरच निवड संधी' उपक्रम आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यात विविध पदांसाठी वेगवेगळ्या पात्रतेच्या नोकरभरतीची गरज असलेल्या उमेदवारांना थेट प्रत्यक्ष मुलाखती घेण्यासाठी निमंत्रित करण्यात येईल. प्रत्यक्ष मुलाखत देऊन पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना लगेचच नोकरीची संधी मिळेल.

लातूर येथे १३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या मुलाखतीद्वारे लातूर येथील दरेकर इव्हेंट प्रा.लि. मध्ये मॅनेजर, एचआर, मार्केटिंग मॅनेजर, वेल्डर, फिटर व लेडीज टेलर पदाच्या १० जागांसाठी भरती होणार असून इयत्ता बारावी, कोणतीही पदवी संबधित आयटीआय ट्रेड असलेले उमेदवार यासाठी पात्र आहेत. लातूर येथीलच देवराज ट्रेनिंग आणि रिक्रुटिंगमध्ये सेल्स एक्झीक्युटीव्ह पदाच्या १० जागांसाठी इयत्ता दहावी, बारावी, कोणतीही पदवी असलेल्या उमेदवारांची भरती केली जाणार आहे. तसेच लातूर येथील द्वारकादास श्यामकुमारमध्ये अकौंटन्ट तथा कॅशियर पदाच्या १० जागांसाठी भरती होणार असून यासाठी इयत्ता बारावी आणि एमएससीआयटी, वाणिज्य शाखेची पदवी असलेले उमेदवार पात्र असतील. संबंधित आस्थापनेचे प्रतिनिधी थेट प्रत्यक्ष मुलाखती घेवून पात्र उमेदवारांची निवड करतील. पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना लगेचच नोकरीची संधी मिळेल.

महास्वयंम पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवारांनी बुधवार, १३ सप्टेंबर २०२३ रोजी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मार्गदर्शन केंद्र, शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयासमोर, लातूर, येथे स्वखर्चाने मुलाखतीसाठी आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे स्वत:चा बायोडाटा, रिझ्युम, पासपोर्ट फोटोसह उपस्थित रहावे. अधिक माहितीसाठी ०२३८२-२९९४६२ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे अवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त यांनी केले आहे.

# १५ कोटी ५९ लाख रकमेच्या प्रकरणाचा निपटारा ! दोघांचे संसार पुन्हा जुळले

उस्मानाबाद : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार दि. ९ सप्टेंबर, २०२३ रोजी संपूर्ण उस्मानाबाद जिल्हयामध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. उस्मानाबाद मुख्यालयाच्या ठिकाणी सकाळी ठिक १०.३० वाजता प्रत्यक्ष लोक अदालतीच्या कामकाजाची सुरवात झाली. या लोक अदालतीमध्ये पॅनल क्र. ०१ वर मा. श्री. आर. एस. गुप्ता, पॅनल प्रमुख यांच्या न्यायालयामध्ये मोटार अपघात प्रकरण क्रमांक ३४/२०२१ या ज्योती विरुध्द Godigit Insurance Company या प्रकरणामध्ये तडजोडीने रुपये ३२,००,०००/ - (अक्षरी रुपये बत्तीस लाख फक्त) मध्ये सदर प्रकरण मिटले. सदर प्रकरणातील अर्जदार महिला ही वयोवृध्द असल्यामुळे मा. श्रीमती. अंजू एस. शेंडे, प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद व पॅनल प्रमुख श्री. आर. एस. गुप्ता हे पहिल्या मजल्यावरून खाली येवून सदर वृध्द महिलेस रुपये ३२,००,०००/- चा धनादेश सुपूर्द केला हे या लोक अदालतीचे खास आकर्षण ठरले. सदरच्या प्रकरणामध्ये अर्जदारांच्या वतीने विधीज्ञ श्री. एम. बी. माढेकर तर विमा कंपनीच्या वतीने श्री. अजित दानवे व श्री. एस. पी. दानवे यांनी काम पाहिले. तसेच मोटार अपघात प्रकरण क्रमांक १०३/२०२३ मध्ये रुपये १,६०,००/- मोटार अपघात प्रकरण क्रमांक ११९ / २०२३ मध्ये रुपये ९,००,०००/- व मोटार अपघात प्रकरण क्रमांक १९/ २०२३ मध्ये १०,००,०००/- इतक्या रक्कमेची तडजोड करण्यात आली. सदरची तीन प्रकरणे ही साधारणपणे दाखल केल्यापासून सहा महिन्याच्या आत निकाली काढण्यात या लोक अदालतीमुळे शक्य झाले.

या लोकअदालतीमध्ये २ वैवाहीक प्रकरणांमध्ये यशस्वी रित्या तडजोड होवून २०२१ पासून पती व पत्नी विभक्त राहत असलेल्या प्रकरणांमध्ये आज त्यांचा मध्ये समेट घडवून दोन्ही प्रकरणांतील महिलांना सासरी नांदावयास पाठविण्यात आले.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृत महोत्सवीवर्षानिमित्त लातूर जिल्हा प्रशासनामार्फत 'अमृत महोत्सव सप्ताह'ला प्रारंभ

लातूर : मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जिल्हा प्रशासनाच्यावतीने ११ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर २०२३ दरम्यान 'अमृत महोत्सव सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहामध्ये मुक्तिसंग्रामाच्या स्मृती जागविण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मुक्तिसंग्रामाची गाथा चित्रफितीच्या माध्यमातून मांडण्यासाठी चित्ररथाला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते आज हिरवी झेंडी दाखवून या सप्ताहाला सुरुवात झाली.

जिल्हा क्रीडा संकुल येथे बुधवार, १३ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत 'क्रीडा महोत्सव २०२३'चे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा क्रीडा संकुलातील बॅडमिंटनल हॉलमध्ये हा महोत्सव होईल. अधिक माहितीसाठी क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्र (भ्रमणध्वनी क्र. ९९७५५७६६००) यांच्याशी संपर्क साधावा.

मराठवाडा मुक्तिसंग्रामावर आधारित दुर्मिळ छायाचित्रे, पत्रकांचे प्रदर्शन १४ सप्टेंबर २०२३ रोजी हुतात्मा स्मारक येथे आयोजित करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता या प्रदर्शनाचे उद्घाटन होईल.

मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृत महोत्सवानिमित्त हुतात्मा स्मारक येथे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन १५ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी १० वाजता होईल. सकाळी ११ वाजता 'मराठवाडा मुक्तिसंग्राम समग्र इतिहास' या विषयावर ज्येष्ठ साहित्यिक तथा माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे आणि इतिहास संशोधक डॉ. सोमनाथ रोडे यांची प्रकट मुलाखत होईल. ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे आणि इतिहास संशोधक विवेक सौताडेकर ही मुलाखत घेणार आहेत.

मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जिल्हा परिषदेचा माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा माहिती कार्यालय आणि बाबासाहेब परांजपे फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'शौर्यगाथा मराठवाडा मुक्तिसंग्रामाची' या ७५ व्याख्यानांच्या व्याख्यानमालेचा समारोप १५ सप्टेंबर २०२३ रोजी सायंकाळी ४ वाजता होणार आहे. यानिमित्त हुतात्मा स्मारक येथे माजी सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांचे व्याख्यान होईल. ज्येष्ठ विचारवंत पन्नालाल सुराणा यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असेल.

मराठवाडा मुक्तिदिनी १७ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ९ वाजता हुतात्मा स्मारक येथे मुख्य ध्वजारोहण होईल. तसेच सायंकाळी ४ वाजता याच ठिकाणी 'मराठवाडा मुक्तिगाथा : लातूर विशेष' या स्मृतीग्रंथाचे प्रकाशन होईल. ज्येष्ठ साहित्यिक तथा माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे आणि इतिहास संशोधक डॉ. सोमनाथ रोडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहील. देशभक्तीपर गीतांनी अमृत महोत्सवी सप्ताहचा समारोप होणार आहे.

# पद्म पुरस्कार-२०२४ साठी नामांकन अर्ज पाठविण्याचे पोर्टल येत्या १५ सप्टेंबर २०२३ पर्यंत खुले

नवी दिल्ली : प्रजासत्ताक दिनानिमित्त जाहीर करण्यात येणार्या पद्म पुरस्कार २०२४ साठी ऑनलाईन नामांकने/शिफारशी, करण्यासाठीचे पोर्टल, दिनांक १ मे २०२३ रोजी पासून सुरू झालेले असून, यावर्षी पद्म पुरस्कारांसाठी नामांकने सादर करण्याची अंतिम तारीख १५ सप्टेंबर २०२३ आहे. या पद्म पुरस्कारांसाठी नामांकन / शिफारशी राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर (https://awards.gov.in) ऑनलाइन पद्धतीने स्वीकारणे सुरू आहे.

पद्म पुरस्कार- पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री, हे देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार आहेत. १९५४ मध्ये स्थापन झालेल्या या पुरस्कारांची घोषणा दरवर्षी प्रजासत्ताक दिनी केली जाते. कला, साहित्य आणि शिक्षण, क्रीडा, वैद्यक, सामाजिक कार्य, विज्ञान आणि अभियांत्रिकी, सार्वजनिक व्यवहार, नागरी यांसारख्या सर्व क्षेत्रांत/विषयांमध्ये विशिष्ट आणि असाधारण कामगिरी/ सेवा करून 'वैशिष्ट्यपूर्ण कार्य' करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. सेवा, व्यापार आणि उद्योग या क्षेत्रांत वंश, व्यवसाय, पद किंवा लिंग असा भेद न करता महत्वपूर्ण कार्य करणाऱ्या सर्व व्यक्ती या पुरस्कारांसाठी पात्र असतात.

डॉक्टर आणि शास्त्रज्ञ वगळता सार्वजनिक उपक्रमांमधून काम करणारे सरकारी कर्मचारी पद्म पुरस्कारांसाठी पात्र नाहीत.

पद्म पुरस्कारांचे रूपांतर जन पद्म पुरस्कार मध्ये करण्यासाठी सरकार प्रतिबद्ध आहे. म्हणून सर्व नागरिकांना विनंती आहे की त्यांनी स्वतःच्या नावासह त्या व्यक्तींसाठी नामांकने/शिफारशी कराव्यात. महिला, समाजातील दुर्बल घटक, अनुसूचित जाती आणि जमाती, दिव्यांग व्यक्ती आणि समाजाची निःस्वार्थ सेवा करणार्या प्रतिभावान व्यक्तींची ओळख करून देण्यासाठी सर्व नागरीक एकत्रित प्रयत्न करू शकतात.

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३, मो.९४०४६८२९९९



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I AME CHANGEING MY SONS NAME WHICH WAS EARLIER : **AFREEN IRSHAD AHEMAD SAYYED TO : AFREEN IRSHAD SAYYED** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **AFREEN IRSHAD SAYYED** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.
**OLD NAME : AFREEN IRSHAD AHEMAD SAYYED**
**NEW NAME : AFREEN IRSHAD SAYYED**
**ADDRESS :** BEHIND MILIND SCHOOL LABOUR COLONY LATUR

**पदवी प्रमाणपत्र हरवले**

उसनाळे वैशाली सौदागर या नावाची स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेडने प्रदान केलेली जून २००८ या शैक्षणीक वर्षात बी. ए. उत्तीर्ण झाल्याची पदवी खोरी गल्ली ते शिवाजी चौक दरम्यान प्रवास करताना हरवली आहे. तरी कोणास मिळून आल्यास त्यांनी खालील मोबाईल क्रमांकावरती संपर्क साधावा.
संपर्क : मो. क्र. ९४२१३७३४८८

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I AME CHANGEING MY SONS NAME WHICH WAS EARLIER : **ANAND PURUSHOTTOMDAS SOMANI TO : ANAND PURUSHOTTAMDAS SOMANI** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **ANAND PURUSHOTTAMDAS SOMANI** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE
**OLD NAME : ANAND PURUSHOTTOMDAS SOMANI**
**NEW NAME : ANAND PURUSHOTTAMDAS SOMANI**
**ADDRESS :** NIRMAL COMPLEX, AUSA ROAD, NANDI STOP, LATUR

**CHANGE OF NAME DECLARATION**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **PATWEGHAR ZUBEDA CHANDSAB TO : ZUBEDA CHANDSAB PATWEKAR** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **ZUBEDA CHANDSAB PATWEKAR** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.
**OLD NAME :- PATWEGHAR ZUBEDA CHANDSAB**
**NEW NAME :- ZUBEDA CHANDSAB PATWEKAR**
**ADDRESS :-** BOUDDH NAGAR, LATUR,

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I AME CHANGEING MY SONS NAME WHICH WAS EARLIER : **SAYYED IRSHAD AHEMAD YUSUF SAYYED TO : IRSHAD YUSUF SAYYED** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **IRSHAD YUSUF SAYYED** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE
**OLD NAME : SAYYED IRSHAD AHEMAD YUSUF SAYYED**
**NEW NAME : IRSHAD YUSUF SAYYED**
**ADDRESS :** BEHIND MILIND SCHOOL LABOUR COLONY LATUR